सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५० | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. जितेंद्र गोहिल
व्यापारी



श्री. पंकज झाडीकर
पी.एन. ज्वेलर्स



श्री. सागर पिंगळे











अमळनेर : सार्वजनिक शिवजयंती उत्सवांतर्गत गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या आवारातील भव्य दिव्य अश्वारूढ पुतळ्यास माल्यार्पण व पूजन करून बालशिवाजींच्या साक्षीने मुख्य मिरवणुकीचा प्रारंभ करताना प्रांताधिकारी मयूर भंगाळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, पालिका बांधकाम सभापती दादा पवार, पाणीपुरवठा समिती सभापती कैलास पाटील, नगरसेवक मोहन सातपुते, शिवसेना तालुका प्रमुख सुरेश पाटील, अॅड. दिनेश पाटील, ज्ञानेश्वर धनगर, नाना धनगर आदींसह आजी-माजी नगरसेवक व विविध पक्षांचे पदाधिकारी. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# शिवछत्रपतींना मानाचा मुजरा..!

## भव्य मिरवणुका, जयघोष, जल्लोष अन् भगव्या रंगाने न्हाले शहर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : सार्वजनिक शिवजयंती उत्सवांतर्गत गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण शहर भगव्या रंगाने न्हाऊन निघाले. विविध उत्सव समित्यांच्या भव्य मिरवणुका, दिमाखदार सजावटीने लक्ष वेधले. शिवछत्रपती शिवाजी महाराज की जय, जय जिजाऊ, जय शिवराय आदी घोषणा देत उपस्थितांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी राजेंना मानाचा मुजरा केला. त्यानंतर मुख्य मिरवणुकीसह विविध मंडळांच्या मिरवणुकांमुळे अमळनेरनगरी दुमदुमली.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही सार्वजनिक शिवजयंती समितीतर्फे मानाचा शिवजन्मोत्सव मोठ्या थाटामाटात, जल्लोषात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. सर्वत्र शिवप्रेमींचा मोठा उत्साह दिसून आला. छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह आवारातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे पूजन व माल्यार्पण करून त्यांना बालशिवाजींच्या साक्षीने उपस्थित मान्यवरांसह शिवप्रेमींची मानाचा मुजरा केला. यात प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांची विशेष उपस्थिती होती. या भव्य सोहळ्यात धार्मिक आणि ऐतिहासिक गीतांनी उत्तम वातावरणनिर्मिती केली.

विविध शाळा व संस्थांच्या विद्यार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यात सायरादेवी बोहरा इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांचे पथनाट्य, न्यू व्हिजन स्कूलच्या लहान मुलांचे सांस्कृतिक सादरीकरण, वृक्षवल्ली महिला लेझीम पथक, रमाई लेझीम पथक, जीत स्टुडिओ ग्रुप यांचे छत्रपती शिवाजी महाराजांवरील नृत्याविष्कार, कन्हैया ग्रुप व रुबजी नगर ग्रुप यांच्या वतीने लाठी-काठी व तलवारबाजीचे प्रात्यक्षिकांनी सारेच मंत्रमुग्ध झाले होते. ढोल- ताशांच्या गजराने आसमंत दुमदुमला होता. मिरवणुकीदरम्यान विविध ठिकाणी अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पालिका हायस्कूल येथे खान्देश रक्षक फाउंडेशन ग्रुप व आजी- माजी सैनिक फाउंडेशनतर्फे यांच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला. पालिका शाळा ते नाट्यगृह मार्गावर मिरवणुकीत भूषण चौधरी यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पाचपांवली देवी मंदिर चौक येथे विजय पाटील (पाटील बिल्डर्स), बसस्थानक येथे नीलेश फार्मा यांच्या वतीने लस्सी वाटप करण्यात आले. विजय मारोती मंदिर येथे हनुमान चालीसा पठणावेळी 'किंग्स ऑफ किंग्स' ग्रुपच्या वतीने (लाडू) प्रसाद वाटप करण्यात आला. महाराणा प्रताप



**सार्वजनिक शिवजयंती उत्सवाच्या प्रारंभापूर्वी पाचपावलीजवळील छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती करताना प्रांताधिकारी मयूर भंगाळे.**

चौक येथे योगेंद्र बाविस्कर व तुषार बाविस्कर यांच्या वतीने शितपेय वाटप, निखिल चव्हाण आणि करण नेरकर कडून कोर्टाच्या परिसरात शरबत वाटप, राज लाड यांच्या वतीने ताक वाटप, तर नाट्यमंदिर येथे आकाश परदेशी यांच्या वतीने थंड पेय वितरण करण्यात आले. रणजित शिंदे यांच्या वतीने त्यांच्या चिरंजीव शिवतेज यांच्या वाढदिवसानिमित्त नाट्यमंदिर येथे शिवभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर झाले.

### मराठी वाङ्मय मंडळात शिवजयंती

स्वराज्याचे संस्थापक, शाश्वत विकासाची हमी देणारे, तत्त्वज्ञान सांगणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व कार्य आजच्या पिढीने आत्मसात करणे महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊन येथील मराठी वाङ्मय मंडळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त मराठी वाङ्मय मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. रवींद्र कुलकर्णी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजय केले, डॉ. महेश पाटील, डॉ. विजय तुंटे यांनी प्रतिमापूजन व माल्यार्पण केले. याप्रसंगी आर. डी. पाटील, चंद्रकांत शिंदे, गोविंद पाटील, हनुमंत पाटील, शांताराम पाटील, हेमंत बाळापुरे, जगदीश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### प्रताप महाविद्यालयात सामान्यज्ञान परीक्षा

येथील खान्देश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयांतर्गत करिअर कौन्सिलिंग सेंटरमध्ये सीसीएमसी विभाग व शिखर अॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंतीनिमित्त सामान्यज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले. सदर परीक्षा १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ दरम्यान झाली. ही परीक्षा ५० प्रश्नांची व १०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची होती. या परीक्षेत १०९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. गुणानुक्रमे येणाऱ्या विद्यार्थ्यांना फेब्रुवारीतील शेवटच्या आठवड्यात योग्य बक्षिसे, गौरवचिन्ह, प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येणार आहे. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, डॉ. विजय तुंटे, अॅड. चंद्रभान पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. मुकेश भोळे, प्रा. डॉ. बालाजी कांबळे, प्रा. डॉ. हर्ष नेतकर, प्रा. अमोल अहिरे, प्रा. डॉ. हेमंत पवार, दिलीप शिरसाठ, पराग पाटील, विशाल अहिरे, प्रा. हिमांशू गोसावी आदींनी परीक्षा यशस्वितेसाठी सहकार्य केले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

### प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यालयातर्फे महाशिवरात्री साजरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यालयातर्फे केंद्रात महाशिवरात्रीनिमित्त सकाळी आठला विविध कार्यक्रम झाले. यात शिवबाबांचा वाढदिवस, ध्वजवंदन तसेच प्रसाद वाटपाचा समावेश होता.

खासदार श्रीमती स्मिताताई वाघ, नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, सौ. योगिताताई पाटील, नगरसेवक व मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले प्रमुख पाहुणे होते. केंद्रप्रमुख विद्यादीदींनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर शिवबाबांच्या वाढदिवसानिमित्त स्मिताताई वाघ यांच्या हस्ते भक्तांच्या उपस्थितीत ध्वजवंदन करून केक कापण्यात आला. याप्रसंगी स्मिताताई वाघ व डॉ. डिगंबर महाले यांनी मनोगत व्यक्त केले.

आरतीदीदी यांनी सूत्रसंचालन केले. रंजनादीदी यांनी आभार मानले. त्यानंतर केंद्रातील उपस्थित भक्तांना दिवसभर प्रसाद वाटप करण्यात आला.

## अमळनेर- चोपडा उड्डाणपुलावरील दिशादर्शक फलक अस्पष्ट..!

### वाहनधारकांची दिशाभूल; सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चोपडा रस्त्यावरील उड्डाणपुलावर दिशादर्शक फलकांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. पुलावरून एक मार्ग चोपड्याकडे तर दुसरा जळोदच्या दिशेने जातो. मात्र, तेथील दिशादर्शक फलकावरील अक्षर पुसटशी झाली आहेत. केवळ जाताना चोपडा असेच नाव स्पष्ट दिसते. मात्र, दुसरा मार्ग असलेले अक्षर पुसले गेले आहे. त्यामुळे बाहेरगावाहून येणारे चालक गोंधळात पडतात. याकडे संबंधित विभागाने लक्ष देवून ती तत्काळ सुस्थितीत करावेत,

पान २ वर

**सार्वजनिक बांधकाम विभागाने याची तत्काळ दखल घेऊन नवीन, मोठे व परावर्तित (रिफ्लेक्टरयुक्त) दिशादर्शक फलक बसवावेत. झुडपे हटवावीत व मार्गदर्शन स्पष्ट करावे, अशी मागणी केली आहे. योग्य दिशादर्शक नसल्यास अपघाताची शक्यताही नाकारता येत नसल्याने प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**










## अमळनेर बसस्थानकाच्या विकासासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर

### खासदार स्मिताताई वाघ यांच्या पाठपुराव्याला यश



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बस स्थानकाच्या विकासासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर झाला आहे. खासदार स्मिताताई वाघ यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या निधीमुळे बस स्थानकाच्या चेहरामोहरा बदलणार आहे.

या निधीतून बस स्थानकाचे सुशोभिकरण व नवनवीन सुविधांचा विस्तार होणार आहे. स्थानक स्वच्छ, सुंदर आणि प्रवाशांसाठी अधिक सुविधायुक्त होणार आहे. या प्रकल्पांतर्गत बस स्थानक परिसराचे संपूर्ण काँक्रिटीकरण, जलनिचरा (गटार व्यवस्था) सुधारणे, सुशोभीकरणासाठी




पेव्हर ब्लॉक बसविणे, रंगकाम तसेच इतर आवश्यक विकासकामे होणार आहेत. या कामांमुळे बस स्थानक अधिक आकर्षक व स्वच्छ दिसणार आहे. दररोज ये- जा करणाऱ्या हजारो प्रवाशांना अधिक सोयी-सुविधा उपलब्ध होतील. अमळनेरच्या जनतेसाठी ही एक मोठी भेट आहे. बस स्थानकाची सद्यस्थिती सुधारण्याची नितांत गरज होती. या विकासकामांमुळे बस स्थानकाचा कायापालट होईल. शहराच्या सौंदर्यातही भर पडेल. या विकासकामांच्या मंजुरीबाबत खासदार स्मिताताई वाघ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक तसेच जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत. या निधीबद्दल प्रवाशांमधून समाधान व्यक्त होत आहे.

संपादकीय

## विचारांची शुद्धता : नात्यांचा खरा आधार

आजचा समाज माहितीच्या प्रचंड प्रवाहात जगतो आहे. सोशल मीडियाच्या एका क्लिकवर बातम्या, मते, अफवा आणि आरोप आपल्यापर्यंत पोहोचतात. मात्र या सर्व गदारोळात आपण एक गोष्ट विसरत चाललो आहोत. स्वतःची विचारशक्ती स्वच्छ आणि स्वतंत्र ठेवण्याची जबाबदारी. कोणाबद्दल कोणाकडून काहीही ऐकून अस्वस्थ होणे, मत बनविणे आणि तीच मते पुढे पसरविणे, ही आजची सर्वांत मोठी सामाजिक व्याधी बनली आहे. ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिस यांची 'ट्रिपल फिल्टर टेस्ट' आजही तितकीच अर्थपूर्ण आहे. सत्य, उपयुक्तता आणि सद्भावनाया तीन कसोट्यांवर एखादी गोष्ट उतरते का, हे तपासल्याशिवाय ती स्वीकारू नये, असा त्यांचा विचार होता. जी गोष्ट खरी नाही, चांगली नाही आणि उपयोगीही नाही, ती ऐकून घेण्यात किंवा पसरवण्यात नेमका कोणता शहाणपणा आहे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

दुर्दैवाने, आज आपण उलट दिशेने चाललो आहोत. एखाद्याबद्दल ऐकलेली अर्धवट माहिती, अपूर्ण सत्य किंवा सरळसरळ अफवा यावरून आपण मते बनवतो. ती मते पुढे नाती बिघडवतात, मनात संशय निर्माण करतात आणि समाजात कटुता पसरवतात. विचार न करता ऐकलेली गोष्ट केवळ दुसऱ्याचे नुकसान करत नाही, तर आपली मानसिक शांतताही हिरावून घेते. खरे तर विचारांची शुद्धता हीच नात्यांची खरी शिदोरी आहे. जेथे घमेंड नाही, गरूर नाही, आणि विचार न जुळणाऱ्यांबद्दल द्वेषही नाही. फक्त आवश्यक तेवढे अंतर आहे तेथेच मानसिक परिपक्वता दिसून येते. प्रत्येकाशी सहमत असणे शक्य नाही; मात्र असहमत असताना माणुसकी आणि विवेक टिकवणे, हेच खरे मोठेपण आहे.

आज समाजात मोठेपणा हा अनेकदा केवळ दिखावा बनला आहे. शब्दांचा, पदांचा, प्रतिष्ठेचा. मात्र वास्तवाचा स्वीकार करून, शांतपणे आणि सजगतेने जगण्यात जो आनंद आहे, तो या दिखाव्यात नाही. विचारपूर्वक बोलणे, ऐकलेली गोष्ट तपासणे आणि गरज नसलेल्या चर्चांपासून दूर राहणे, हेच खरे शहाणपण आहे. म्हणूनच आजच्या काळात सॉक्रेटिसची ट्रिपल फिल्टर टेस्ट ही केवळ तत्त्वज्ञान न राहता, दैनंदिन जीवनाची गरज बनली आहे. प्रत्येक ऐकीव गोष्टीवर विश्वास ठेवण्याआधी, प्रत्येक मत बनवण्याआधी आणि प्रत्येक प्रतिक्रिया देण्याआधी या तीन प्रश्नांची उत्तरे शोधली, तर नाती अधिक सशक्त होतील, मन अधिक शांत राहील आणि समाज अधिक सुसंस्कृत बनेल. विचार स्वच्छ असतील, तर शब्द संयमित राहतील आणि शब्द संयमित असतील, तर नाती आपोआप जपली जातील.

## अमळनेर– चोपडा उड्डाणपुलावरील दिशादर्शक फलक अस्पष्ट..!

पान १ वरून

अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. पुलावरून पुढे गेल्यानंतर लावण्यात आलेले फलक चोपडा– जळोद काटेरी झुडपांमुळे झाकले गेले आहेत. परिणामी ते दूरवरून दिसत नसल्याने वाहनधारकांना योग्य वळण ओळखणे कठीण होत आहे. जळोद जाणारे प्रवासी हे चोपड्याच्या दिशेने निघतात. मात्र, चुकीच्या मार्गाने पुढे गेल्यानंतर स्थानिकांकडे विचारपूस करून पुन्हा मागे फिरावे लागते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.दरम्यान, चोपडाकडून अमळनेरकडे येताना पुलाजवळ तीन रस्ते वळले आहेत. तेथे केवळ एकच फलक अमळनेर असा दर्शविणारा लावण्यात आला आहे. तोही तीन रस्त्यांच्या मधोमध असल्याने नेमका कोणता मार्ग शहरात जातो याबाबत वाहनचालकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. परिणामी काही जण चुकीच्या मार्गाने जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

## वैभव सूर्यवंशीच्या बॅटवर त्याचे नाव चुकीचे?

वैभव सूर्यवंशीने अल्पावधीतच क्रिकेटमध्ये नावलौकीक मिळवला आहे. नुकताच पार पडलेल्या अंडर वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील जेतेपदात त्याचा मोलाचा हातभार राहिला. आयपीएल स्पर्धेत वैभव सूर्यवंशी राजस्थान रॉयल्सकडून मैदानात उतरणार आहे. राजस्थान रॉयल्सच्या कॅम्पमध्ये तो कठोर सराव करत आहे. सरावादरम्यान आक्रमक फलंदाज वैभव सूर्यवंशीने बॅटबद्दल मोठा खुलासा केला आहे. यावेळी त्याने शुभम दुबेच्या बॅटचे कौतुक केले. तेव्हा त्याच्या शेजारी बसलेल्या व्यक्तीचे लक्ष वैभवच्या बॅटकडे गेले आणि त्यावर त्याचे नाव लिहिलेले पाहिले. तेव्हा वैभवच्या बॅटवर त्याला नाव चुकीचे दिसले. वैभव सूर्यवंशीचे नाव प्रत्येक बॅटवर चुकीचे का लिहिले जाते हे खेळाडूने स्वतःच स्पष्ट केले. त्याचे कारण म्हणजे त्याचे नाव मोठे आहे. त्यामुळे Vaibhav Sooryavanshi ऐवजी Vaibhav Suryavanshi असे लिहिले जाते.


# जुन्या ॲपचा पासवर्ड रेल्वे प्रवाशांना वापरता येणार

## यूटीएस बंद झाले तरी पैसे नव्या ॲपमध्ये होणार ट्रान्सफर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : भारतीय रेल्वे १ मार्चपासून जनरल तिकिटासाठीचे यूटीएस ॲप बंद करून रेलवन हे नवीन सुपर ॲप सुरू करत आहे. या निर्णयामुळे ज्या प्रवाशांच्या यूटीएस आर– वॉलेटमध्ये मोठी रक्कम शिल्लक आहे, त्यांच्यात चिंतेचे वातावरण होते. मात्र, रेल्वे प्रशासनाने आता प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. जुन्या वॉलेटमधील एकही पैसा वाया जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

अनेक प्रवाशांनी जनरल तिकिटासाठी आर–वॉलेटमध्ये आगाऊ पैसे भरून ठेवलेले असतात. प्रवाशांना त्यांचे पैसे परत मिळवण्यासाठी कोणतीही कटकट करण्याची गरज नाही. १ मार्चनंतर जेव्हा प्रवासी रेलवन हे नवीन ॲप डाउनलोड करतील तेव्हा त्यांना त्यांच्या जुन्या यूटीएस ॲपचाच मोबाइल नंबर (लॉगिन आयडी) आणि पासवर्ड वापरावा लागेल. हा आयडी टाकताच जुन्या वॉलेटमधील संपूर्ण शिल्लक रक्कम नव्या ॲपमध्ये दिसून येईल आणि ती वापरता येईल. याबाबत जनजागृतीही केली जाणार आहे



### तिकीट बुकिंगचा त्रास वाचणार


आयआरसीटीने आपल्या आय पे– ॲपवर रिझ्यूम रेट्री बूकिंग फीचर लाँच केले आहे. हे त्या सक्सेसफुल व्यवहारांमध्ये सुधारणा करण्यासाठी आहे. ज्यात पैसे कापले जातात. तिकिटे बुक केली जात नाहीत. हे यूजर्सना त्याच दिवशी व्यवहाराची रक्कम समान असेल, तर पुढील बुकिंगसाठी वजा केलेली रक्कम वापरण्याची परवानगी देते.

### डिजिटल पेमेंटवर 3% सवलतीचा फायदा

प्रवाशांना आर–वॉलेट किंवा यूपीआयने पैसे भरून तिकीट काढल्यास त्यांना ३ टक्के सूट मिळेल. सवलतीसाठी प्रवाशांनी आतापासून रेलवन ॲपमध्ये आपले प्रोफाइल सेट करणे सोयीचे ठरणार आहे. तुमच्या तिकिटाचा पीएनआर नंबर टाकून तुम्ही ते कन्फर्म झाले आहे की नाही, हे त्वरित पाहू शकता. त्यामुळे वेळेची बचत होईल.

# बाल्कनीतील पिंपळाचे झाड काढण्यासाठी काय करावे?

## काहीच लागणार नाही फक्त काढण्याची ट्रिक पाहा



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बाल्कनीत किंवा घरात लहान आकाराचे पिंपळाचे झाड काढणे हा एक अत्यंत संवेदनशील विषय आहे. कारण या झाडाची मुळे खोलवर जातात आणि त्यांना सहजपणे तोडणे किंवा दुखावणे शक्य नाही. शिवाय, पिंपळाचे झाड धार्मिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या महत्वाचे मानले जाते. त्यामुळे त्याला सुरक्षितपणे काढणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. सोशल मीडियावर पिंपळाचे झाड मूळापासून कसे काढावे, यावर माहिती देण्यात आली आहे. जाणून घेऊयात काय आहे ट्रिक ?

बाल्कनीत किंवा घरात पिंपळाचे झाड लहान असले तरी ते काढणे हे फार संवेदनशील काम आहे. पिंपळाच्या मुळे खोलवर जातात आणि त्यांना सहजपणे तोडणे किंवा दुखावणे हे कठीण असते. झाड काढताना काळजी घेणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने झाड काढले तर ते तुटू शकते किंवा मुळांवर नुकसान होऊ शकते. जे झाडाचे जीवन धोक्यात आणते. मुख्य ट्रिक म्हणजे झाड काढताना मुळे जास्तीत जास्त सुरक्षित ठेवणे. कोणतेही रासायनिक पदार्थ न वापरणे आणि झाड हलवताना संयम बाळगणे. झाड काढण्यापूर्वी झाडाभोवती जमीन स्वच्छ करा आणि पाणी द्या. यामुळे माती सैल होईल आणि मुळे सहज बाहेर येतील. झाडाची मुळे कुठे जात आहेत ते लक्षपूर्वक पाहा. मुळे तुटू नयेत याची खबरदारी घ्या.

# स्वारगेट बसस्थानकात महिलेवर अत्याचार..!

## एका वर्षानंतर महामंडळाला आली जाग; आता बसवणार सात हजार सीसीटीव्ही

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

एसटी महामंडळाच्या प्रवाशांना सीसीटीव्हीचे सुरक्षा कवच लाभणार आहे. महामंडळाने नवीन सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सीसीटीव्हींच्या निगराणीसाठी मुंबई सेंट्रल मुख्यालयात नियंत्रण कक्ष उभारण्यात येणार आहे. येत्या वर्षभरात एसटी स्थानकात सात हजार सीसीटीव्हींचे जाळे कार्यान्वित होणार आहे.

**६४ ठिकाणी बसविणार कॅमेरे**

गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात पुण्यातील स्वारगेट स्थानकातशिवशाही बसमध्ये एका महिलेवर अत्याचाराची घटना घडली होती. घटनेनंतर प्रवाशांच्या विशेषतः महिला



सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला होता. घटनेच्या वर्षभरानंतर प्रवासी सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही सुरक्षा प्रकल्पाला गती मिळाली आहे. प्रकल्पाच्या प्राथमिक टप्प्यात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर विभागातील ६४ महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही प्रणाली बसविण्यात आली आहे. उर्वरित २७ विभागांसह कार्यशाळा आणि कार्यालय परिसरात येत्या महिन्याभरात काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### राज्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर लक्ष ठेवणे शक्य

एसटी स्थानकांसह आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी यांसारख्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात येत आहे. राज्यातील सर्व सीसीटीव्हींच्या निगराणीसाठी मुंबई सेंट्रल येथील महाराष्ट्र वाहतूक भवन येथील मुख्यालयात मध्यवर्ती नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहे. कक्षाची वापरकर्ता स्वीकृती चाचणी यशस्वी झाली आहे. नियंत्रण कक्षातून राज्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर एकाच ठिकाणी लक्ष ठेवणे शक्य होईल, अशी माहिती महामंडळाने दिली.

# उधना–पुणे स्पेशल ट्रेनला हिरवा कंदील

## खासदार स्मिताताई वाघ यांच्या पाठपुराव्याला यश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जळगाव, धुळे, नंदुरबार तसेच पुणे परिसरातील प्रवाशांची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर असल्याची माहिती समोर आली आहे. उधना– पुणे स्पेशल ट्रेनचा प्रस्ताव निर्णायक टप्प्यात पोहोचल्याने ताप्ती सेक्शनमधील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.ही प्रस्तावित स्पेशल ट्रेन नंदुरबार–जळगाव–मनमाड या ताप्ती मार्गावरून धावणार आहे. यामुळे पश्चिम महाराष्ट्र व गुजरातदरम्यान थेट रेल्वे संपर्क प्रस्थापित होणार आहे. त्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.खा. स्मिता वाघ यांनी या प्रस्तावाला प्राधान्य देत प्रशासनाशी औपचारिक संपर्क साधला. तसेच मुख्यालय, पुणे व भुसावळ रेल्वे विभागांशी समन्वय साधून व्यवहार्यता, वेळापत्रक आणि संचालन क्षमतेबाबत सविस्तर चर्चा केली. प्रशासनिक पातळीवर संबंधित विभागांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.धरणगाव तालुका प्रवासी मंडळानेही सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. मंडळाचे अध्यक्ष व पश्चिम रेल्वेचे सदस्य महेंद्र कोठारी यांनी उच्च अधिकाऱ्यांसमोर प्रवाशांच्या अडचणी मांडल्या. पश्चिम रेल्वेचे महाप्रबंधक, विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि परिचालन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीत तांत्रिक व वेळापत्रकासंदर्भातील मुद्द्यांवर सकारात्मक सहमती दर्शविण्यात आल्याचे समजते.

### ट्रेन सुरू झाल्यास संभाव्य फायदे

ताप्ती सेक्शनमधील प्रवाशांना थेट सेवा.मनमाड, चाळीसगाव, पाचोरा परिसरातील प्रवास सुलभ.तिकीट वेटिंग कमी होण्याची शक्यता.व्यापार, शिक्षण व रोजगारासाठी सोयीस्कर मार्ग.शिर्डीला जाणाऱ्या भाविकांसाठी थेट सुविधा.उधना, नवापूर, नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, धरणगाव, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, अहिल्यानगर, दौंड मार्गे पुणे असा संभाव्य मार्ग चर्चेत आहे.

# जगातील सर्वांत मोठे झाड कोणते?

## नाव वाचून व्हाल चकित!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

या जगात वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष आहेत. मात्र, पृथ्वीवर असे काही वृक्ष आहेत, जे गेल्या अनेक वर्षांपासून जिवंत आहेत. पृथ्वीवर सर्वात जुने झाड कोणते आहे, ते जाणून घेऊ या...

पर्यावरणाच्या संतुलनासाठी, प्रदूषण कमी करण्यासाठी पृथ्वीवर झाडांचे असणे खूप गरजेचे आहेत. आजघडीला पृथ्वीवर झाडांच्या लाखो प्रजाती आहेत. काही प्रजाती तर फारच दूर्मिळ आणि चमत्कारिक आहेत. पृथ्वीवर असे काही झाड आहेत जे शेकडो वर्षे जगतात.

काही झाड हे आकाराने फारच विशाल असतात. पृथ्वीवरचे सर्वात मोठे झाड नेमके कोणते आहे, असे नेमही विचारले जाते. आता याच झाडाबाबत आपण जाणून घेऊ या. मिळालेल्या माहितीनुसार अमेरिकेतील सिकोईया



राष्ट्रीय उद्यानात हे झाड आहे. हे झाड खूपच विशाल आणि महाकाय आहे. सिकोईया नॅशनल पार्कमध्ये असलेल्या जनरल शेरमेन या झाडाला पृथ्वीवरील सर्वात मोठे झाडा मानले जाते. या झाडाचे वय साधारण २२०० ते २७०० वर्षे असल्याचे सांगितले जाते. या झाडाने पृथ्वीवर झालेले अनेक बदल पाहिले असतील, असे म्हटले जाते. जनरल शेरमेन हे झाड साधारण २७५ फूट उंच आहे. हे जगातील सर्वात उंच झाड नसले तरीही ते सर्वात मोठे असल्याचे म्हटले जाते. या झाडाचे घनफळ (व्हॅल्यूम) तब्बल ५२ हजार ५०० क्युबिक फूट असल्याचे सांगितले जाते. तर या झाडाचा व्यास ३६ फूट आहे. हे झाड साधारण २ हजार वर्षांपेक्षाही जुने आहे. तरीदेखील ते अद्याप जिवंत आहे. घनफळाच्या दृष्टीने हे झाड जगातील सर्वात मोठे असे झाड आहे. चिलीमध्ये एक ग्रेट ग्रँडफादर नावाचे एक झाड आहे. या झाडाचे वय ५ हजार ४०० वर्षे असल्याचे बोलले जाते.

# दुधावर येईल भाकरीएवढा जाड मलाईचा थर..!

## 'ही' सोपी ट्रिक, हाताने उचलता येईल इतकी जमेल साय

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दुधाच्या वर तयार होणारी जाड मलई केवळ तूप काढण्यासाठीच वापरली जात नाही तर अनेक गोड पदार्थ आणि पदार्थांची चव देखील वाढवते. लोक अनेकदा तक्रार करतात की त्यांच्या दुधावर सायच येत नाही किंवा आली तरी खूप पातळ मलाई येते. अशा परिस्थितीत, जाड क्रीम मिळविण्यासाठी तुम्ही खाली दिलेली ट्रिक वापरू शकता.

दूध गरम करणे ही रोजची गोष्ट असली तरी त्यावर जाड साय (मलाई) जमवणे ही एक कला आहे. अनेकदा दूध उकळूनही त्यावर हवी तशी जाड साय येत नाही, ज्यामुळे तूपही कमी निघते. 'आयांश की रसोई' कडून मिळालेल्या माहितीनुसार, जाड साय जमवण्यासाठी दुधाचे तापमान आणि ते थंड होण्याची प्रक्रिया या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. दुधावर जाड साय जमणे ही कोणतीही जादू नसून ते विज्ञानावर आधारित आहे. जेव्हा दूध उकळते, तेव्हा त्यातील फॅट्स (वसा) वरच्या थरावर जमा होतात.

घाई केली किंवा दूध उकळताच लगेच झाकून ठेवले, तर साय पातळ राहते. जाड साय हवी असेल तर दुधातील पाण्याचा अंश वाफेवाटे बाहेर पडणे गरजेचे असते. योग्य पद्धतीने दूध उकळले आणि त्याला सेट होण्यासाठी पुरेसा वेळ दिला. प्रत्येक वेळी तुम्हाला जाड साय मिळेल, ज्यातून तुम्ही भरपूर लोणी आणि तूप काढू शकता.

### दूध ढवळणे टाळा

एकदा दुधावर सायीचा हलका थर दिसू लागला की, त्यात चमचा किंवा पळी अजिबात घालू नका. जर तुम्ही साय सेट होत असताना ती ढवळली, तर सायीचे कण विखुरले जातात आणि साय जाड धरत नाही. साय सोनेरी आणि स्पष्ट दिसू लागली की गॅस बंद करा.

### जाड बुडाच्या पातेल्यात दूध उकळणे

साय जमवण्याची सुरुवात भांड्याच्या निवडीपासून होते. नेहमी जाड बुडाचे पातेले वापरा जेणेकरून दूध खाली लागणार नाही. सुरुवातीला दूध मोठ्या आचेवर गरम करा. मोठ्या आचेमुळे दुधातील फॅट्स सक्रिय होतात. दूध गरम होत असताना मध्येच एकदा ढवळून घ्या, जेणेकरून साय एकसारखी जमा होण्यास मदत होईल. दुधाला पहिली उकळी येताच गॅसची फ्लेम अगदी मंद करा. मलाई जमण्याची खरी प्रक्रिया याच वेळी सुरू होते. मंद आचेवर दूध काही वेळ शिजू दिल्याने त्यातील अतिरिक्त पाणी वाफेवाटे उडून जाते आणि दुधाचा वरचा थर घट्ट होऊ लागतो. हा थर जोपर्यंत स्पष्ट दिसत नाही, तोपर्यंत दूध मंद आचेवर राहू द्या.



### जाळीच्या झाकणाचा वापर

गॅस बंद केल्यावर दूध लगेच फ्रीजमध्ये ठेवू नका किंवा त्यावर ताट झाकू नका. दुधावर जाळीदार झाकण ठेवा जेणेकरून उरलेली वाफ बाहेर पडेल. जर तुम्ही पूर्ण बंद झाकण ठेवले, तर वाफेचे पाणी सायीवर पडते आणि साय पातळ होते. दूध पूर्णपणे खोलीच्या तापमानाला थंड होऊ द्या.

### फ्रीजमध्ये रात्रभर सेट करणे

दूध पूर्णपणे थंड झाल्यावर ते पातेले हळूच फ्रीजमध्ये ठेवा. रात्रभर किंवा किमान ५– ६ तास फ्रीजमध्ये दूध राहिल्याने सायीचा थर कडक आणि स्थिर होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा तुम्ही साय काढाल, तेव्हा ती एखाद्या चपातीसारखी अखंड आणि जाड बाहेर येईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# शिवाजी महाराजांच्या कुटुंबात कोण कोण होते?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज केवळ महान योद्धा नव्हते, तर कुटुंबवत्सल राजा होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक पैलू आजही अनेकांना माहित नाहीत. महाराजांनी आठ विवाह केले होते. सगुणाबाई, सईबाई, -सोयराबाई, पुतळाबाई, लक्ष्मीबाई, सकवारबाई, काशीबाई आणि गुणवंताबाई. १६७४च्या राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांच्या चार राण्या हयात होत्या. त्यावेळी पट्टराणी होण्याचा मान सोयराबाईंना मिळाला.



**महाराजांचे पुत्र**

महाराजांना दोन पुत्र होते. संभाजी महाराज आणि राजाराम महाराज. राज्याभिषेकाच्या वेळी युवराज म्हणून संभाजी महाराजांची निवड झाली.

**लहानपणी आईचा आधार हरपला**

संभाजी महाराज अवघे अडीच वर्षांचे असतानाच त्यांच्या आई सईबाईंचे निधन झाले. हा महाराजांच्या कुटुंबासाठी मोठा आघात होता.

**रायगडावरील अंतर्गत तणाव**

पट्टराणी सोयराबाई आणि युवराज संभाजी महाराज यांच्यातील अधिकारांमुळे रायगडावर मतभेद आणि तंटेबखेडे सुरू झाले.

**महाराजांच्या सहा कन्या**

शिवाजी महाराजांना सहा मुली होत्या. सर्व मुलींचे विवाह नामांकित घराण्यात झाले. मात्र, महाराजांचा एकही जावई स्वराज्याच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाल्याचे आढळत नाही.

**आईचा आशीर्वाद आणि अखेरचा क्षण**

महाराजांच्या आई जिजाबाई यांनी आपल्या मुलाचा राज्याभिषेक पाहिला. तो आनंद त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च क्षण होता.

**जिजाबाईंचे निधन**

आपल्या मुलाला सिंहासनावर बसल्याचे पाहून त्या माऊलीच्या आनंदाला पारावार राहिला नाही. राज्याभिषेक झाल्यानंतर १२ दिवसांनी म्हणजे १७ जून १६७४ रोजी जिजाबाईंचा मृत्यू झाला.

**स्वराज्याच्या मागे उभे होते कुटुंब**

शिवाजी महाराजांचे आयुष्य फक्त युद्धांनी नाही, तर कुटुंबातील आनंद, दुःख आणि त्यागांनीही घडले. स्वराज्याच्या पाठीमागे उभे होते एक मोठे कुटुंब.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्वयंपाकात कोणते मसाले वापरले जायचे?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी जाणून घ्यायला आपल्या प्रत्येकाला आवडते. अनेकांना शिवाजी महाराजांच्या आहाराविषयी जाणून घ्यायची फार उत्सुकता असते. जाणून घेऊयात त्या काळी स्वयंपाकात कोणते मसाले वापरले जायचे ?

**मसाले**

अगदी जुन्या काळात आजच्या प्रमाणात मिरची नव्हती. मात्र, तरीही जेवणात तिखट चव आणण्यासाठी विविध नैसर्गिक मसाल्यांचा वापर केला जात होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात लोकांचा आहार साधा पण चविष्ट होता आणि ते मसाले जेवणाला स्वाद देत होते.

**काळी मिरीचा वापर**

महाराजांच्या काळात चवदार पदार्थासाठी काळी मिरी हा मुख्य मसाला होता. मिरची भारतात नव्हती तरी मिरीची तिखटपणा देणारी चव उपलब्ध होती. ही मिरी स्वयंपाकात तिखटपणासाठी वापरली जात होती. त्या काळात आले हे मसाला आणि औषध दोन्ही म्हणून महत्त्वाचे होते. याची तिखट चव अन्नाला स्वाद देत होती. आले आहारात नियमित समाविष्ट केले जायचे

**लसणाचा वापर**

लसूणही तिखटपणा आणि सुगंध देणारा घटक म्हणून स्वयंपाकात त्याचा वापर केला जात होता. लसूण नैसर्गिक चव वाढवणारी म्हणून काम करत होती. लसूणाच्या तुकड्यांचा अनेक पदार्थात वापर केला जायचा.

**मिरचीचा इतिहास**

छत्रपतींच्या काळात लाल मिरची भारतात नव्हती कारण तिचा उगम दक्षिण अमेरिकेत झाला होता. ही मिरची पोर्तुगालच्या व्यापाऱ्यांद्वारे भारतात आली. त्यामुळे शिवकाळात मिरची फारशी वापरात नव्हती. मसाल्यांची नैसर्गिक उपलब्धता मसाल्यांमध्ये मिरी, आले, लसूण हे स्थानिक आणि नैसर्गिकरित्या उपलब्ध होते. ही मसाले अन्नाचा स्वाद वाढवण्यासाठी वापरले जात असते. हे मसाले शरीराला उष्णता आणि पचनास मदतही करत होते.

# हम दिल दे चुके सनम : कोणत्या सत्यकथेवर आधारीत आहे चित्रपट?

**८०-९० च्या दशकात जन्माला आलेल्या अख्ख्या एका पिढीला वेड लावणारा सिनेमा**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

संजयलीला भन्साळींचे डायरेक्शन, तगडी स्टारकास्ट, इस्माईल दरबारचे म्युझिक, जबरदस्त गाणी असा एकसे बढकर एक कॉकटेल झाल्यावर 'हम दिल दे चुके सनम'चा हँगओव्हर आजही उतरलेला नाही. सिनेमाची सर्वांत जमेची बाजू म्हणजे भन्नाट असणारी स्टोरी. ही कहाणी अनेकांच्या मनात कालवाकालव करणारी ठरली होती. कोणत्या सत्यकथेवर आधारीत आहे चित्रपट? जाणून घेऊया.



या सिनेमाच्या कहाणीमागील जी सत्य कहाणी आहे ती यापेक्षा भन्नाट आहे. संजयलीला भन्साळी तसा अवलिया माणूस. त्याने ही कहाणी उचलून जन्माला आला 'हम दिल दे चुके सनम'! अशा साहित्यिक किंवा वाङ्मयीन निर्मितीची चोरीला इंग्रजीत प्लाजीरायझम हा शब्द वापरला जातो. भारतात प्लाजीरायझमचा धंदा फार जोरात चालतो. सोप्या शब्दात साहित्यिक चोरी म्हणजे पुस्तकांची, साहित्यकृतींची कॉपी करणे. संजयलीला भन्साळींचे नशीब, त्यांनी केलेल्या चोरीवर कोणीच तक्रार केली नाही. आक्षेप घेतला नाही आणि कोणीही न्यायालयाकडे दाद मागितली नाही. चला तर आज वाचू पडद्यामागची सत्यकथा या चित्रपटाची.

बंगालमध्ये एक-एक थोर तत्त्वज्ञानी होऊन गेले सुरेंद्रनाथ दासगुप्ता. त्यांना एक अत्यंत हुशार मुलगी होती मैत्रेयी. या मुलीचा वयाच्या सोळाव्या वर्षी काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला होता. याला प्रास्ताविक होते, रवींद्रनाथ टागोर यांचे. मैत्रेयीदेवी जेव्हा कॉलेजला जात होती, त्याच काळात तिच्या वडिलांनी एक रोमानियन स्कॉलर तरुण मर्सिया एलीएड याला त्यांच्या घरी राहण्याचे आमंत्रण दिले. एकाच घरात राहत असल्याने मैत्रेयी देवी आणि एलीएड या दोन्ही अत्यंत हुशार जीवांचे एकमेकांवर प्रेम जडायला वेळ लागला नाही. आता एकाच घरात राहून फुलणारे प्रेम जास्त दिवस लपून राहणारे नव्हते.

दासगुप्ता साहेबांनी २३ वर्षीय एलीएडला त्यांचे घर सोडून जाण्यास सांगितले. तो निघून गेला आणि इकडे २० वर्षीय मैत्रेयीदेवीचे लग्न ३४ वर्षीय डॉ. मनमोहन सेन यांच्यासोबत लावून देण्यात आले.

एलीएड आणि मैत्रेयीदेवी यांच्या कहाणीचा हा इंटर्वल काळ म्हणावा असा होता. कारण १९७२मध्ये मैत्रेयी देवी यांना समजले की एलीएडने बेंगाल नाईटस् नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने या दोघांचे लैंगिक सबंध चवीने लिहिले होते. खरेतर बेंगाल नाईटस हे इंग्रजी भाषांतर होते. त्याने १९३३ मध्ये रोमानियन भाषेतला न्यूट बंगाली नावाची कादंबरी लिहिली होती. या कादंबरीचे मूळ नाव हे देखील मैत्रेयी असे होते. पुढे ही कादंबरी इटालियन, जर्मन, स्पॅनिश अशा अनेक भाषांमध्ये प्रकाशित झाली. सर्वांत गाजलेले भाषांतर हे फ्रेंचमधील होते.

यावेळी मैत्रेयी देवी यांचे वय ५८ होते. त्या काळात त्यांनी एक काव्यसंग्रह प्रकाशित केला. या कविता म्हणजे त्यांची इतक्या दिवसानंतर या गोष्टी निघाल्यावर बाहेर पडलेली अस्वस्थता व्यक्त करणाऱ्या होत्या, असेही म्हणण्यात आले. याच काळात मैत्रेयीदेवी शिकागो येथे रवींद्रनाथ टागोर यांच्यावर लेक्चर द्यायला गेल्या. येथेच एलीएड प्रोफेसर होता. येथे या दोघांची अनेकदा पुन्हा एकदा भेट झाली. तेथून परतल्यावर मैत्रेयीदेवी यांनी मग बंगाली भाषेत न हन्यते नावाची कादंबरी प्रकाशित केली. दोन वर्षांत या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार देखील मिळाला. यात त्यांनी एलीएडने रचलेल्या लैंगिक कथा कशा चुकीच्या आहेत आणि फक्त त्याचा कल्पनाविस्तार आहे अशी मांडणी केली. ही कादंबरी इंग्लिशमध्येही आली. इट डज नॉट डाय : ए रोमान्स या नावाने.

पुढे एलीएडच्या बेंगाल नाईटसवर ह्यू ग्रँट आणि सुप्रिया पाठक यांना घेऊन सिनेमा तयार झाला. मात्र, यावर मैत्रेयीदेवी यांनीच आक्षेप घेतला आणि सिनेमा बारगळला. संजयलीला भन्साळी त्यात हुशार ठरला, त्याने या कहाणीपासून प्रेरणा घेत पूर्णपणे वेगळा सिनेमा तयार केला. मात्र, 'न हन्यते' या कादंबरीचा उल्लेख त्याने चित्रपटाच्या क्रेडिट लाइनमध्ये केला नाही.

# छत्रपति शिवाजी महाराज दाढ़ी क्यों रखते थे?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

छत्रपति शिवाजी महाराज की पर्सनैलिटी सिर्फ़ बहादुरी तक ही सीमित नहीं थी, बल्कि उनके पहनावे, दाढ़ी-मूंछ, पहनावा और दरबार में उनकी शक्ल-सूरत भी सोच-समझकर रखी जाती थी। उन दिनों दाढ़ी रखना सिर्फ़ पर्सनल ज़रूरत नहीं थी, बल्कि सोशल और कल्चरल इमेज का हिस्सा था।

**एक असरदार पर्सनैलिटी के लिए**

उन दिनों दाढ़ी को राजा की पहचान माना जाता था। इसका मकसद दुश्मन पर साइकोलॉजिकल असर डालना भी था। दरबार में पर्सनैलिटी सबसे अलग दिखती थी।

**योद्धा परंपरा का हिस्सा**

मराठों और दक्कन के योद्धा कल्चर में दाढ़ी-मूंछ को इज़्ज़त की निशानी माना जाता था। बहादुर सैनिक और सरदार दाढ़ी रखते थे। राजा भी इसी परंपरा को मानते थे।

**धार्मिक और कल्चरल असर**

हिंदू क्षत्रिय परंपरा में नेचुरल लुक बनाए रखने का सम्मान था। संतों, गुरुओं और योद्धाओं में दाढ़ी रखना आम बात थी। यह कल्चरल पहचान बनाए रखने का एक हिस्सा था।

**पेंटिंग और मूर्तियों के सबूत**

मौजूद पेंटिंग में, महाराजा दाढ़ी में दिखते हैं। रायगढ़ और दूसरी जगहों की मूर्तियों में भी इसे इसी तरह दिखाया गया है।

**कोर्ट का अनुशासन और ड्रेस कोड**

शाही दरबार में एक खास ड्रेस कोड का पालन किया जाता था। दाढ़ी और मूंछ रखना अनुशासन माना जाता था। यह पॉलिटिकल इमेज का हिस्सा था।

**अपना लुक बदलने के लिए**

१७वीं सदी में दाढ़ी रखना आम बात थी। कई राजा और सरदार इसी रूप में दिखते हैं। इसके अलावा, इसे अपना लुक बदलने के लिए भी काम का माना जाता था।

# पारंपरिक बंधने झुगारून मिळविले यश!

## नोकरी सोडली; आज कमवत आहे वर्षाला सुमारे ४० लाख रुपये

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**सक्सेस स्टोरी**



कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यातील कविता मिश्रा यांनी पारंपरिक विचारसरणीला छेद देत शेती क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. १९९६ साली विवाहानंतर त्यांनी कधीच शेती हा आपला व्यवसाय असेल असे कल्पनाही केली नव्हती. त्यांनी कर्नाटक विद्यापीठातून संगणकशास्त्रात डिप्लोमा पूर्ण केला आणि १९९८ मध्ये इन्फोसिस येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर पदाची संधीही मिळाली. मात्र कौटुंबिक परंपरांमुळे त्यांना ही नोकरी सोडावी लागली. यानंतर त्यांनी खचून न जाता पतीच्या पुश्तैनी जमिनीवर शेती करण्याचा निर्णय घेतला.

रायचूर जिल्ह्यातील कविताल गावातील ही जमीन पूर्णपणे बंजर, खडकाळ आणि डोंगराळ होती. सुरुवातीची काही वर्षे अत्यंत कठीण गेली. सातत्यपूर्ण मेहनतीनंतर २००६ मध्ये त्यांनी डाळिंबाची लागवड सुरू केली. कमी पाण्यात येणारे पीक म्हणून डाळिंब योग्य ठरले आणि काही वर्षांत प्रत्येक हंगामात १ ते २ लाख रुपयांचे उत्पन्न मिळू लागले. मात्र २०११-१२ मध्ये बॅक्टेरियल ब्लाइट या रोगाने संपूर्ण बाग उद्ध्वस्त केली. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार सर्व झाडे उपटावी लागली. अनेक वर्षांची मेहनत वाया गेल्यानंतरही त्यांनी हार मानली नाही. एका कृषी सल्लागाराच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी इंटीग्रेटेड फार्मिंग मॉडेल स्वीकारले आणि 'कविता मिश्रा चंदन फार्म'ची स्थापना केली. या फार्ममध्ये मुख्यतः पांढऱ्या चंदनाची लागवड केली जाते. याशिवाय आंबा, पेरू, सीताफळ, आवळा, जांभूळ, चिंच, नारळ, केळी, कॉफी, मिरी, हळद अशा विविध बागायती पिकांची लागवड केली आहे. सागवान आणि लाल चंदनाची झाडे लावून त्यांनी शेतीला ॲग्रोफॉरेस्ट्रीचे रूप दिले आहे. विविध पिकांमुळे उत्पन्नाचे स्रोत वाढले आणि जोखीम कमी झाली.

चंदनाच्या लागवडीसाठी त्यांनी कर्नाटक सोपस् ॲन्ड डिटर्जंट लिमिटेड (केएसडीएल) सोबत औपचारिक करार केला आहे. चोरीचा धोका लक्षात घेऊन झाडांमध्ये मायक्रोचिप आधारित ई-सुरक्षा प्रणाली बसविण्यात आली आहे. ही यंत्रणा संशयास्पद हालचाली झाल्यास जवळच्या पोलिस ठाण्याला सतर्क करते. आज कविता मिश्रा आपल्या फार्ममधून वार्षिक सुमारे ४० लाख रुपयांचे उत्पन्न कमावत आहेत. प्रतिएकर कोट्यवधी रुपयांच्या संभाव्य परताव्याचा त्यांचा अंदाज आहे. परंपरागत बंधने, नैसर्गिक अडचणी आणि रोगराई यांवर मात करून त्यांनी जिद्द, नवकल्पना आणि वैज्ञानिक पद्धतींच्या बळावर यश मिळवले आहे. त्यांची कहाणी ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे आणि आधुनिक, शाश्वत शेतीचा आदर्श निर्माण करत आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# आठवड्यातील सात वारांची निर्मिती कशी व का झाली?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वाराची देवता कोणती? आपण युगानुयुगे वर्षानुवर्षे रवी, सोम, मंगळ अशा सात वारांशिवाय कोणत्याही प्रकारचा व्यवहार करत नाही. यांच्याशिवाय कसलाही व्यवहार होणे अशक्य आहे. राजा परिक्षिताला शाप मिळाला, की या सात दिवसांत एक दिवस तुझा मृत्यू निश्चित आहे. आणि प्रत्येक मनुष्याचा देखील जन्म व मृत्यूचा एक वार निश्चित आहे. एकंदरीत काय तर संपूर्ण विश्वच या सात वारांवर अवलंबून आहे. असे असताना आपण कधी असा विचार केला का? तो म्हणजे या सात वारांची निर्मिती कशी झाली? व ती कोणी केली? ज्याच्याशिवाय आपले व्यवहार चालूच शकत नाहीत. त्याची दखल घेणे आपले आद्य कर्तव्य आहे. ज्ञानरूपी प्रकाशाशिवाय अज्ञानरूपी अंधार नाहीसा होत नाही.

आज बहुतांशी समाज आपल्या वेद, शास्त्र, पुराणांना थोतांड समजणारा आहे. शिवाय देव व धर्माला न मानणारा आहे. पण आपल्याला ठाऊक आहे का? या सात वारांचा निर्मिता कोण आहे ते? सृष्टीचा आरंभ होत असताना भगवान शंकर यांनी समस्त लोककल्याणासाठी या वारांची कल्पना केली. थोडक्यात सांगायचे झाले तर भगवान शंकर संसाररूपी रोगाचा नाश करणारे वैद्य आहेत. तसेच औषधांचेही औषध आहेत. भगवान शंकरांनी सात देवतांच्या नावांनी वारांची कल्पना केली व त्या प्रत्येक वाराचा स्वामी म्हणून ग्रहांची योजना केली. ते पुढीलप्रमाणे.

### शिवपुराणानुसार

- **देवता शंकर :** स्वामी सूर्य
- **वार :** रविवार
- आरोग्यप्राप्ती

- **देवता मायाशक्ती :** स्वामी चन्द्रमा
- **वार :** सोमवार
- सम्पत्ती प्राप्ती

- **देवता कुमार कार्तिकेय :** स्वामी मंगळ
- **वार :** मंगळवार
- व्याधी निवारण

- **देवता भगवान विष्णू :** स्वामी बुध
- **वार :** बुधवार
- पुष्टिवर्धक

- **देवता ब्रह्मदेव :** स्वामी बृहस्पती
- **वार :** गुरुवार
- आयुष्यवृद्धी

- **देवता इंद्र :** स्वामी शुक्र
- **वार :** शुक्रवार
- भोग दायक

- **देवता यम :** स्वामी शनैश्चर
- **वार :** शनिवार
- मृत्यूचे निवारण

अशाप्रकारे शिवपुराणानुसार सात वारांची सृष्टीच्या हितासाठी भगवान शंकरांनी निर्मिती केली. म्हणून आपल्या धर्मात देवता व ग्रहांना विशेष स्थान आहे.

# भक्तजनांचा कल्पवृक्ष : श्री हरिबाबा महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'संभवामि युगे युगे' या भगवंताच्या वचनानुसार भगवंत जगात वेळोवेळी माणसाचा देह धारण करून येत असतो. क्वचित वेळी तो अवतार म्हणून येतो, तर इतर वेळी संत म्हणून जन्म घेऊन समाजाला स्वतःच्या वागण्यातून आदर्श जीवनाचे धडे देत असतो. परमेश्वराचे नाम घेणे हा प्रत्येक संताच्या उपदेशाचा गाभा आणि जीवनाचा मंत्र असला तरी प्रत्येक संताची ते सांगण्याची पध्दत वेगवेगळी असते. श्री रामदास स्वामींनी कडकडीत वैराग्य पाळून रामनामाचा घोष केला, तर श्री तुकाराम महाराजांनी संसारात पडूनही विठ्ठलाच्या भक्तीसाठी सर्व सुखांवर तुळशीपत्र ठेवलं. श्री गोंदवलेकर महाराजांनी संसाराकडे एका वेगळया नजरेनं पहात रामनामाची कास कशी धरावी हे शिकविले, तर वेगवेगळे व्यवसाय वाट्याला आलेल्या श्री गोरा कुंभार, श्री सावता माळी, श्री नरहरी सोनार यांच्यासारख्या अनेक संतांनी आपल्या कामाच्या माध्यमातून परमेश्वराचे अनुसंधान कसे ठेवायचे हे समाजाला शिकविले.


वेगवेगळ्या प्रांतांत आणि वेगवेगळ्या वातावरणात अशा संतांनी जन्म घेतला तरी त्यांची स्वतःची अशी वेगळी जीवनपद्धती असते. तिच्याप्रमाणेच राहून ते लोकांवर संस्कार घडवतात. विरक्ती हा त्यांच्या जीवनाचा आत्मा असतो. लोकांकडून त्यांना काहीच अपेक्षा नसते. उलट लोकांनाच भरभरून देण्यासाठी ते आलेले असतात. फलटणच्या पवित्र भूमीत अशाच एका संताने फलटणवासीयांना अचानक दर्शन दिले ते येथील मारुतीच्या मंदिरात. तो सुवर्णदिन होता आश्विन शुद्ध द्वादशी शके १९७९. काही संतांचा जन्म कुठे आणि कधी झाला, त्यांचे आई-वडील कोण इत्यादी गोष्टी सगळ्यांना माहीत असतात. त्यामुळे त्यांचा जन्मदिवस आपण जयंती म्हणून साजरा करतो. परंतु अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, शेगावचे श्री गजानन महाराज किंवा शिर्डीचे श्री साईबाबा यांच्यासारख्या ज्या विभूतींच्या जन्माबद्दल काहीच माहिती नसते, त्या ज्या दिवशी लोकांसमोर प्रकट झाल्या तो दिवस आपण त्यांचा प्रकटदिन म्हणून साजरा करतो.

फलटणचे श्री हरिबाबा हे याच मालिकेतील संत असल्यामुळे आपण त्यांचा प्रकट दिन उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करतो. तर त्या दिवशी माध्यान्हीला मारुती मंदिरात फलटणकरांना ज्या संताचे दर्शन झाले त्याचे नावही त्याना कळू शकले नव्हते. कारण त्यांनी नाव विचारल्यावर त्यांना भलतेच उत्तर मिळाले होते. हळूहळू गावात ही बातमी पसरल्यावर कुणी उत्सुकतेने, तर कुणी गंमत म्हणून, कुणी दर्शनासाठी; तर कुणी टर्र् उडवण्यासाठी म्हणून तेथे येऊन गेले. पण सायंकाळ झाली तरी हा महात्मा सकाळी घातलेल्या सिद्धासनातच स्थिर होता. सायंकाळी फलटण संस्थानाचे अधिपती मुधोजीराजे नाईक निंबाळकर हे त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणे मारुतीच्या दर्शनाला आले असताना हा दिव्यात्मा त्यांच्या नजरेस पडला. त्यांनी जवळ जाऊन अतिशय विनम्रपणे त्यांचे दर्शन घेऊन राजवाड्यायावर चलण्याची प्रार्थना केली. राजाच्या आणि फलटणनगरीच्या पूर्वपुण्याईमुळेच जणू हा महात्मा येथे आलेला असल्यामुळे राजाच्या प्रार्थनेला त्वरित मान देऊन राजमंदिरात जाता झाला. राजानेही अतिशय भक्तिभावाने पूजन करून सुग्रास भोजन अर्पण केले. राजवाड्यातला कण न् कण आज धन्य झाला होता.

हळूहळू या महात्म्याविषयी सर्वत्र चर्चा सुरू झाली तेव्हा हे कळाले, की फलटणला प्रकट होण्याअगोदर हा महात्मा पणदरे या फलटणपासून जवळ असलेल्या गावी लोकांना दिसला होता. त्यानंतर नातेपुते आणि पंढरपूर या पुण्यक्षेत्री काही काळ राहून नंतर शिखर शिंगणापूर या महादेवाच्या तीर्थक्षेत्री बराच काळ रमला. आणि त्यानंतर मात्र फलटणक्षेत्री आपले नियोजित जनउध्दाराचे कार्य करण्यासाठी मानवरूपातला हा शंकर त्याचाच अंशावतार असलेल्या मारुतीच्या मंदिरात प्रकट झाला. पूर्वी या महात्म्याला पाहिलेल्या भाविकांकडूनच त्याला 'हरिबाबा' या नावाने ओळखतात हेही कळाले. फलटणक्षेत्री प्रकट झाले त्यावेळी हरिबाबांचे वय साधारणपणे ४० वर्षांचे असावे. परंतु अशा विभूतींच्या वयाचे आणि क्षमतेचे गणित बांधणे हे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे असते.

राजाने हरिबाबांना राजवाड्यात नेले खरे, पण वैराग्य हाच अलंकार घालून वावरणारे हरिबाबा त्या ऐश्वर्यात थोडेच रमणार होते. सोने, चांदी, पैसे आणि ऐश्वर्य यांचे अप्रूप सामान्य माणसाला. हरिबाबांसारख्या योगीराजाला त्याचे काय. लोकांना या गोष्टीची प्रचिती वेळोवेळी पहायला मिळत असे. राजाने नेसवलेले किमती वस्त्र दुसऱ्याच क्षणी काढून टाकून आपल्या नेहमीच्या दिगंबर अवस्थेत जाणे, त्याने कौतुकाने दिलेले चांदीचे भांडे कुठेही भिरकावून देणे या वैराग्याची झलक दाखवणाऱ्या गोष्टींच्या जोडीलाच कधी एखाद्याच्या घरात शिरून तिथले कपडे बाहेर फेकून देणे, घरात लहान मूल असेल तर त्याला उचलून त्याचे मुके घेणे, कधी मध्यरात्रीला रस्त्यात उभे राहून भजन करणे, तर कधी शिव्याच देत सुटणे, कधी दगड गोळा करून त्यावर आपण स्थानापन्न होणे, तर कधी तापलेल्या वाळूवर शांतपणे आडवे होऊन वर तल्लीनपणे विठ्ठलाचे भजन करणे अशा लीला लोकांना पाहायला मिळत. हे भजनही द्रविड, तेलंगी, कानडी अशा वेगवेगळ्या भाषांमधले असायचे. तरीही त्या गाण्यामध्ये असा भाव आणि तल्लीनता असायची की ऐकणाऱ्याने भाषा कळली नाही तरीही स्वतःला विसरून जावे. भजनाचा शेवट 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल' अशी गर्जना करून होत असे.

श्री हरिबाबा कधी-कधी देवळात येत. तेव्हा कधी देवाचे दर्शन घेऊन निघून जाते, तर कधी तेथे चालू असलेले कीर्तन, प्रवचन ऐकायलाही थांबत. आणि कधी तर तेथे चक्क झोपी जात. कधी ते शांत वाटत, तर कधी त्यांची मुद्रा उग्र भासत असे. या उग्र मुद्रेमुळे मुले हरिबाबांना फार घाबरत असत. आणि मुलेच काय, मोठी माणसे सुध्दा हरिबाबा येताना दिसले, की घराची दारे पटापट लावत असत. कधी-कधी हरिबाबा एखाद्याच्या घरी जाऊन खायला भाकरी मागत. ज्याच्या घरी हरिबाबा गेले ती व्यक्ती श्रध्दावान असेल तर व्यवस्थित सगळे पदार्थ वाढलेले ताट बाबांसमोर येई. परंतु बाबांनी सगळे पदार्थ एकत्र कालवून खायला सुरूवात केली, की यजमान पाहतच



राही. आता विकारांचा मागमूस नसलेल्या त्या महात्म्याला जिभेच्या चोचल्यांमध्ये कुठून रस असणार.

एखाद्याने हरिबाबांना नमस्कार करण्यासाठी खाली वाकले, की बाबांनी त्याच्या डोक्याचे पागोटे काढून स्वतःच्या डोक्यावर ठेवावे हा प्रकारही काही वेळा बघायला मिळे. कधी हरिबाबा अचानक खदाखदा हसायला लागत, तर कधी एकदम मौनसुध्दा धारण करत. समाज म्हटल्यावर सगळया प्रकारची माणसे असणारच. कधी हरिबाबांना कौतुकाने दूध पाजणारा भाविक जसा भेटायचा, तसा कधी दारू पाजणारा किंवा गांजा ओढायला देणारा रसिकही भेटायचा. परंतु या सगळ्याच्या पलीकडे गेलेल्या बाबांना त्याने काय फरक पडणार. समोर ठेवलेल्या पैशांना, वस्तूंना आणि अर्पण केलेल्या वस्त्रांना देखील हाच न्याय मिळत असे. हरिबाबा गावातून हिंडत असताना त्यांच्या हातून घडणाऱ्या कृतीतून काही वेळा नुकसान होत असे. ते टाळण्यासाठी राजाने बाबांच्या मागेमागे फिरायला स्वतःचे सेवक ठेवले होते. परंतु काही दिवसांतच 'हे जमणे शक्य नाही' हे लक्षात आल्यामुळे राजाने ती योजना बासनात गुंडाळून ठेवली.

साधू-संतांची योग्यता सर्वसामान्य माणसाला समजू शकत नाही. कारण तो बाह्यरूपावरुन ती ठरवण्याचा प्रयत्न करतो. पण हिऱ्याची पारख करायला जसा रत्नपारखीच लागतो, तसा संत आणि साधूंना ओळखणं हे फक्त साधूंनाच शक्य असते. बाकीच्यांच्या लक्षात फक्त त्यांचे विचित्र वागणेच राहाते. खरेतर हे विचित्र वागणे त्यांनी एवढयाकरताच धारण केलेले असते, की त्यामुळे फक्त स्वार्थासाठीच त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांना जरब बसावी. सर्वसामान्य माणूस हा त्याच्या पूर्वकर्मांची फळ भोगत भोगत जीवन जगत असताना अगदी जेरीस आलेला असतो. संत सत्पुरुष त्याचे हे जगणे सुसह्य करण्यासाठी त्याला मार्गदर्शन करायला आलेले असतात. पण माणूस त्या सत्पुरुषाला 'आपल्या इच्छा पूर्ण करणारे यंत्र' समजून स्वतःमध्ये काही सुधारणा करण्याऐवजी त्यालाच सारखा मागत राहतो. सत्पुरुष हे साक्षात् परमेश्वरस्वरूप असल्यामुळे काहीही द्यायला समर्थ असतात. पण माणसाचे 'हे हवे-ते हवे' हे कितीही मिळाले तरी न संपणारे असल्यामुळे सत्पुरुष ते नियंत्रणात ठेवायला शिकवण्याचा प्रयत्न करत असतात.

'चित्त शुध्द ठेवून प्रत्येक काम करा' अशा सोप्या शब्दांमध्ये हरिबाबा उपदेश करत. चित्त शुध्द असल्याशिवाय आपली कोणतीही सेवा देव सुध्दा स्वीकारत नाही, असे सांगत असताना दांभिकपणे, म्हणजे प्रदर्शन करुन सेवा करणाऱ्या लोकांवर ते परखडपणे टीका करत. एकदा पणदऱ्यात राहणाऱ्या धोंडी वाणी यांच्या घरी गेले असताना हरिबाबा तेथे जमलेल्या भाविकांना रात्रभर उपदेशाचे अमृत देत होते आणि सारे भाविकही कानांमध्ये प्राण आणून ते स्वीकारत होते. बाबांच्या पणदऱ्यात त्या दहा वर्षांच्या वास्तव्यामध्ये घडलेला तो एकमेव प्रसंग होता की जेव्हा बाबा सलग एवढा वेळ भक्तांना आयुष्य सार्थकी लावण्याचा कानमंत्र देत होते.

सत्पुरुषांच्या नुसत्या कृपादृष्टीने सुध्दा समोरच्या व्यक्तीला झालेल्या रोगापासून मुक्ती मिळते. हा अनुभव हरिबाबांच्या बाबतीत सुध्दा असंख्य लोकांनी घेतला. अगदी असाध्य झालेल्या आणि डॉक्टरांनी सुध्दा हात टेकलेल्या रोग्यांना देखील बाबांकडून संजीवनी मिळाल्याची उदाहरणे त्या पंचक्रोशीमध्ये नेहमीच घडत असत. आपले दुःख दूर करणारी व्यक्ती आपल्यासाठी देवासमान असते. येथे हरिबाबा तर साक्षात् देवच होते. पण देवाला ओळखणे एवढे सोपे थोडेच आहे. त्यामुळे घरी आलेल्या बाबांना धक्के मारून बाहेर काढणारे अज्ञानी जीव सुध्दा काही कमी नव्हते. परंतु विकारांवर ताबा मिळवलेले हरिबाबांसारखे दयासागर त्या अज्ञानी जीवांच्याही कल्याणासाठी प्रयत्न करतच राहतात.

आपल्या पूर्वजांकडून आपल्याला अनेक पारंपारिक व्रतवैकल्ये समजतात. वेगवेगळया गोष्टी साध्य होण्यासाठी वेगवेगळी व्रते असतात. पण असा अनुभव येतो, की एखादे पारंपरिक व्रत एखाद्या सत्पुरुषाने करायला सांगितले, की त्यामध्ये फलप्राप्ती अगदी त्वरित होते याला कारण म्हणजे त्या सत्पुरुषाच्या वाणीमध्ये असलेले अपार सामर्थ्य. एखादा पारंपरिक मंत्र सुध्दा सत्पुरुषाकडून मिळाला की तो जपल्यावर त्वरित फळ देतो. त्यामागेही हेच कारण असते. श्री हरिबाबांनी एका स्त्रीला सोमवारचे व्रत करायला सांगितल्यानंतर तिला पुत्रप्राप्ती झाली. संत-महात्मे हे खरेतर स्वतःचे सामर्थ्य त्यामागे लावून अशा व्रताचे महात्म्य वाढवत असतात.

रोग्याच्या अंगाला लावायला माती देणे किंवा त्याच्या अंगावर थुंकणे हा प्रकार इतर अनेक संतांप्रमाणेच श्री हरिबाबांच्या चरित्रातही पाहायला मिळतो. माती किंवा थुंक्याच्या माध्यमातून रोगमुक्तीचा अतिशय प्रबळ आणि पवित्र संकल्पच ते संत त्या रोग्यापर्यंत पोहोचवत असतात. आणि तो संकल्प सिध्दीला जाणे म्हणजेच त्या रोग्याला रोगापासून मुक्ती मिळणे असते.

सत्पुरुषांकडे काय मागावे हे सामान्य माणसाला कळत नाही. त्यामुळे बहुतेक वेळा कल्पवृक्षाला भाजीसाठी भोपळा मागण्याचा प्रकार घडतो. परंतु संसारातल्या म्हणजे व्यवहारातल्या गोष्टी कितीही मागून घेतल्या तरी कायमस्वरूपी समाधान कधीही मिळत नाही आणि मग माणूस एकामागून एक मागण्या करत असतानाच त्याचे आयुष्य संपते. पण त्यापासून इतर कोणी सहसा धडा शिकताना दिसत नाही. श्री हरिबाबांनी अशा व्यवहारातल्या गोष्टी मागायला आलेल्या कित्येक लोकांच्या इच्छा पूर्ण करून ते मागणे कसे अपूर्ण, म्हणजे चुकीचे आहे हे दाखवून दिले.

प्रेतामध्ये परत प्राण आणणे हा चमत्कार इतर अनेक संतांप्रमाणे श्री हरिबाबांच्या चरित्रातही दिसतो. पण हे एवढे सरळ असते तर संतांनी सगळ्यांनाच मरणाच्या पाशातून सोडवले असते. पण असे घडत नाही. कारण नैसर्गिक म्हणजे काळमृत्यूच्या बाबतीत संत कधीही हस्तक्षेप करत नाहीत. अपमृत्यू, म्हणजे गंडांतर असेल तरच समोरच्या परिस्थितीनुसार संत निर्णय घेऊन त्या व्यक्तीला जीवनदान देतात. काही वेळा अशा व्यक्तीकरता नियतीने काही विशिष्ट कार्य राखून ठेवलेले असते. त्यामुळे त्या व्यक्तीला मिळालेले जीवनदान हीही नियतीचीच योजना असते.

'प्राणीमात्रांवर दया करावी' हा संदेश संत हे मनुष्यप्राण्यावर दया करून खऱ्या अर्थाने आचरणात आणतात. कारण स्वार्थ, कृतघ्नता, शौर्याच्या नावाखाली केलेले क्रौर्य हे दुर्गुण माणसाइतके इतर कुठल्याच प्राण्यात नसावेत. तरी ते मानवसमाजासाठी आपला देह सतत झिजवत राहतात. सापासारखा प्राणी हा दिसला की त्याला ठार मारायचे ही आपल्या डोक्यात पक्की असलेली कल्पना. पण आपण त्याला त्रास दिला नाही तर साप काहीही उपद्रव करत नाही, हे हरिबाबांनी एकदा एका सापाला मारायला निघालेल्या लोकांना पटवून दिले.

असह्य आणि असाध्य झालेली पोटदुखी रोग्याला काहीतरी खायला देऊन बरी करणे ही गोष्ट बऱ्याच संतांच्या चरित्रात का बघायला मिळते, याचा विचार केला तर या किंवा मागच्या कुठल्या तरी जन्मात दुसऱ्याच्या पोटावर अन्याय करण्यामुळे त्याला ही पोटदुखी जडलेली असते हे संतांच्या लक्षात येते. कर्म जाळण्याचे सामर्थ्य असणारे संत स्वतःची शक्ती खर्ची घालून दुःखितांचे दुःख दूर करतात. देवाला मलिदा अर्पण करण्याचा नवस पूर्ण न करण्यामुळे एका जणाला लागलेली असह्य पोटदुखी श्रीहरिबाबांनी अंतर्ज्ञानाने ओळखून त्याच्याकडून तो नवस पुरा करून घेऊन बरी केली. सगळे ज्याने आपल्याला दिलंय त्या देवालाच 'मी तुला अमके-तमके अर्पण करीन' अशी लालूच दाखवणे आणि काम होताच दिलेले हे वचन सोयिस्करपणे विसरणे या दोन्ही गोष्टी लीलया करणाऱ्या माणसाच्या धाडसाचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

श्री हरिबाबांनी नुसता स्पर्श केल्यामुळे रोग बरा होणे, विषबाधा दूर होणे वगैरे अनुभवही खूप लोकांनी घेतले. पण एकदा खुद्द हरिबाबांनाच पोटदुखीचा असह्य त्रास होऊ लागला. तेव्हा भक्तांनी बाबांना औषध घेण्याचा आग्रह केला. त्यावर बाबा म्हणाले, की 'अरे औषधानं रोगाचा नाश होईल, पण कर्मांच्या नाशाचे काय? 'यातून बाबांना हेच सांगायचे होते की कर्मांच्या फळातून माझीही सुटका नाही. अर्थात ही कर्म बाबांनी भक्तांच्या सुटकेसाठी त्यांची स्वतःच्या अंगावर घेतलेलीच कर्म बहुताशांने असायची. हाताने काम करावे, पण मनात विठ्ठलाचे नाम असावे, संसार मनापासून करावा पण देवाचे विस्मरण होऊ नये, सुख किंवा दुःख; दोन्हीही जास्त मनात ठेवू नये, कोणाचाही अनुभव घेतल्याशिवाय त्याला चांगला किंवा वाईट ठरवू नये, आपल्या पूर्वकर्मांमुळे आपले चित्त मलीन झालेले असते. त्यामुळे आपल्याला सत्पुरुष ओळखता येत नाही. अशा अगदी सोप्या शब्दांमध्ये हरिबाबा उपदेश करत.

सीताराम करंजकरांचा पांगळा मुलगा हरिबाबांनी त्याच्या डोक्यावर हात ठेवताच उठून पळू लागला हा लोकांना चमत्कार वाटला, परंतु संसारात पांगळे झालेल्या किती लोकांना बाबांनी उभे केले त्याची गणती कोण करणार. बाबांच्या आशीर्वादाने पीक शतपटीने वाढले हा चमत्कार लोकांनी अनुभवला, पण बाबांनीच पेरलेले भक्तीचे पीक किती पिढ्यांचे कल्याण करणारे ठरणार हे कोण बरे सांगू शकेल. मान-सन्मान, सोपस्कार या गोष्टी योगी माणसाचे नुकसान करायला कारणीभूत होतात. त्यामुळे योगी सत्पुरुष हे नेहमी आपण खुळे आहोत, असाच साऱ्यांचा समज व्हावा असे वागतात. श्री हरिबाबांनीही तेच केले. त्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने ओळखणाऱ्या लोकांनीच त्यांच्यावर खरे प्रेम केले. काहींनी त्यांची परीक्षा पाहण्याचा प्रयत्न केला, तर कित्येकांनी त्यांच्या बाह्यरंगावरुनच त्यांना बाद ठरवून टाकले. प्रत्यक्षात जीवनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लोकांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरुंचीच परीक्षा घेणाऱ्या लोकांची कीव करावी तेवढी थोडीच. पण अज्ञानी माणूस कोणत्या थरापर्यंत चुका करेल हे सांगणे अशक्य असते. असो.

तर अशा रीतीने श्री हरिबाबांचे जनकल्याचे कार्य त्या पंचक्रोशीमध्ये अविरतपणे चालू होते. स्वतःच स्वतःचे मालक असलेले हरिबाबा त्यांच्या मनात येईल तसा सर्वत्र संचार करत. परंतु समस्या असलेल्या घरासमोर बोलावणे धाडल्याप्रमाणे अचानक दत्त म्हणून उभे राहत आणि त्या व्यक्तीला उपाय सांगून लगेच दिसेनासेही होत. हरिबाबा हे लोकांना प्राणवायुसारखे झाले होते. कारण समस्येचे निराकरण म्हणजे हरिबाबा हे सूत्रच झाले होते. आणि समस्या नाही असा या जगात कोण बरे आहे? दिवसेंदिवस हरिबाबांचे भक्त वाढत चालले होते. आणि बाबांनीही लोकांची दीन अवस्था बघून आपल्या दयेचे आणि कृपेचे छत्र जास्तीत जास्त लोकांवर धरण्याचा प्रयत्न ठेवला होता. पण शेवटी मानवी देह धारण केला की सत्पुरुषांच्या जीवनालाही मर्यादा येतात. देहाचे सर्व भोगही त्यांना भोगणे क्रमप्राप्त होऊन जाते. बाबांची सेवा करणारेही खूप लोक होते. पण वयोमानाप्रमाणे देहाला येणारा थकवा कसा बरे दूर होणार? बाबा हे देहात असूनही विदेही अवस्थेत होते हे खरे असले तरीही देहाच्या आधारानेच आत्मा काम करत असल्यामुळे देहाची कमी कमी होत जाणारी कार्यक्षमता सत्पुरुषांच्या कार्यावर परिणाम घडवतेच.

### सदगुरू श्री हरिबाबा समाधी

हल्ली हरिबाबांचा मुक्काम फलटण शेजारच्या मलठणमध्येच होता. काया थकलेली होती. त्यामुळे भ्रमंती जवळजवळ थांबली होती. कधी फिरायला जावेसे वाटले तर बाबा कुठल्या तरी भक्तांच्या खांद्यावर बसून जात. हरिबाबा धर्मशाळेत एका खोलीत राहत. त्या खोलीत भक्तमंडळी सतत भजन करत असत. श्री हरिबाबांच्या आज्ञेप्रमाणे भक्तांनी रथसप्तमीच्या दिवशी धार्मिक कार्यक्रम करून उत्सव साजरा करायला सुरूवात केली होती. पहिल्या वर्षी भक्तांनी भजन, अन्नदान आणि इतर धार्मिक कार्यक्रम करून तो उत्सव साजरा केला. दुसऱ्या वर्षी रथसप्तमी जवळ आल्याबरोबर भक्तांना मागच्या वर्षीची आठवण झाली आणि मग सारे उत्साहाने कामाला लागले. सुंदर असा मंडप उभारला गेला. रथसप्तमीच्या दिवशी सकाळी सूर्याचे पूजन करण्यात आले. अळीअळीतून भक्तांच्या दिंड्या निघाल्या. सारे निघाले होते उत्साहाने आणि भक्तिभावाने त्यांचे आराध्य दैवत असलेल्या श्री हरिबाबांच्या दर्शनाला. दिवसभर त्या उत्सवमूर्तीसमोर भजनादी कार्यक्रम झाले. दुसऱ्या दिवशी महाप्रसाद झाला. भात, सांबार, लापशी असा बेत होता. आकंठ प्रसाद घेऊन सारे भक्तगण तृप्त झाले. तिसऱ्या दिवशी म्हणजे नवमीला सायंकाळी रावजींचे चिरंजीव नारायणबुवा यांचे संत एकनाथ महाराजांच्या आख्यानावर कीर्तन झाले. पुढे दशमीला दहीहंडीचा कार्यक्रम होऊन या भक्तिजागराची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे एकादशीला श्री हरिबाबांच्या खोलीमध्ये बाबांचा सेवक बाबांचे पाय चेपून देत होता. बाकीचेही काही भक्त बाजूला बसले होते. पण एका क्षणी अचानकच बाबांचे पाय एकदम गार वाटू लागले. एकाने, दुसऱ्याने, तिसऱ्याने हे पाहिल्यावर सगळेच हादरले. एका जणाने पटकन जाऊन वैद्यांना बोलवून आणले. पण वैद्यांनी तपासताक्षणीच खिन्न आवाजात सांगितले, की 'बाबांनी देह कधीच सोडलाय. ' ते शब्द तेथे असलेल्या शिष्यांच्या कानात उकळलेल्या शिसाच्या रसागत पडले अन् त्या खोलीत एकच रडारड सुरू झाली. रथसप्तमीच्या उत्सवाची कालच सांगता झाली. आणि सारे आनंदाचे डोही तरंगत असताना ही एकच लाट साऱ्यांना दुःखसागराच्या तळाशी घेऊन गेली? कुणालाच काही सुचत नव्हते. तेथे आता दुःख आणि विरहाशिवाय काहीच नव्हते. इतकी वर्षे फलटण आणि परिसरातल्या लोकांचा आधार बनलेला तो महापुरुष त्याच्या साम्राज्यात परत गेला होता. अशक्य ते शक्य करणारा ईश्वरी जादूगार आज गुप्त झाला होता. भक्तजनांचा कल्पवृक्ष आज अचानक सुकला होता. अगदी साध्या भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा संत स्वधामाच्या वारीला गेला होता. या देहाचे चीज सत्कर्म करण्यामध्येच आहे हे सांगणारा दिगंबर स्वतःचा सुगंध घराघराला देऊन स्वतःच्या घरी गेला होता. दिसल्यापासून आजतागायत कुणालाही न उलगडलेला हा परमेश्वर आता अचानक आला तसाच अचानक गेला होता.

हळूहळू डोंगरावरच्या वणव्यासारखी ही बातमी साऱ्या भक्तांची मने होरपळून काढत सर्वदूर पसरली, आणि काही वेळातच मलठणच्या दिशेने लोकांचे लोंढेच लोंढे वाहू लागले. भजन-दिंडयाही येऊ लागल्या. भगवंताच्या आणि हरिबाबांच्या नामघोषानं मलठण दणाणून निघाले. पूर्वेच्या बाजूला हरिबाबांचा देह आसनस्थ करून ठेवण्यात आला होता. थोडयाच वेळात तेथे मुंगीलाही शिरायला जागा मिळणार नाही एवढी गर्दी झाली. आणि एक एक करून सारे जण त्या दैवताचे अंत्यदर्शन डोळयांमध्ये साठवू लागले. खुद्द मालोजीराजे निंबाळकर हे देखील दर्शन घेऊन गेले. त्यांनी केलेल्या सूचनेबरहुकूम पर्वतराव निंबाळकर यांनी त्रिजटेश्वराच्या आणि पुंडलिकाच्या मंदिराच्या मध्यावर सुंदर अशी समाधी बांधून घेतली. श्री मुधोजीराजे निंबाळकर हेही दर्शन घेऊन गेले. त्यानंतर भक्तांनी बाबांना स्नान घालण्यासाठी पाणी तापवले. गोविंदराव कानडे यांनी पुरुषसुक्त म्हणून बाबांना पंचामृताचा अभिषेक घातला. मंगलस्नान घातले, त्यानंतर बाबांच्या डोक्यावर टोपी आणि अंगावर कफनी घालण्यात आली. कपाळावर केशराचा टिळा लावण्यात आला. त्यावर अक्षता लावल्या गेल्या. गळयात फुलांच्या माळा घालण्यात आल्या. टोपीवर तुळशीपत्रे ठेवली गेली. नंतर बाबांची पूजा आणि आरती झाली, आणि मग ढोल, ताशे, झांज, शंख, शिंग, तुतारी, घंटा, दुंदुभी अशा वाद्यांच्या गजरात फुलांच्या विमानात बसवून त्या योगमूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. पुंडलिकांच्या आणि त्रिजटेश्वराच्या मंदिराला उजवी घालून ती मिरवणूक समाधीस्थळी आली. समाधीच्या आतमध्ये उत्तम आसन तयार करण्यात आले. त्यावर श्री हरिबाबांना बसवण्यात आले. शेजारी दोन नंदादीप जळत होते. सर्व विधी पूर्ण झाल्यावर जेव्हा समाधी बंद करण्यात आली, तेव्हा 'सद्गुरू हरिबुवा महाराज की जय' च्या गगनभेदी घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला, समाधीच्या वरच्या भागावर महाराजांच्या कोरलेल्या पादुकांचेही पूजन करण्यात आले. माघ शुद्ध एकादशी शके १८२० (इ.स.१८९८) ला दुपारी ४.३० वाजता जरी हा सोहळा संपन्न झाला, तरी पुढे कितीतरी वेळ भक्तमंडळी या ठिकाणी खिळून होती.

श्री हरिबाबांच्या दर्शनाला नित्यनेमाने येणारे लोक जरी खूप होते आणि हरिबाबांनी अगणित लोकांवर जरी कृपा केलेली असली, तरी समर्थ रामदास स्वामींना जसे कल्याण किंवा श्री गोंदवलेकर महाराजांना जसे केतकर बुवा तशा हरिबाबांना लाटे गावच्या मोरे घराण्याची सून झालेल्या गोजिराबाई या अधिकारी शिष्या होत्या. भक्ती आणि अधिकार या पूर्णपणे वेगवेगळया गोष्टी आहेत. भक्ती करणारे खूप भक्त किंवा शिष्य असले तरी तेवढा अधिकार प्राप्त केलेला शिष्य हा फार विरळा असतो. गोजिराबाईंना सारेजण 'आईसाहेब' या नावाने ओळखत आणि त्यांनीही असंख्य लोकांचे कल्याण करून लाटे या गावीच देहत्याग केला. धन्य गुरू हरिबाबा आणि धन्य शिष्योत्तमा आईसाहेब.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)